

ज्ञानबलशीलोपासना

सन्मित्र मंडळ, गोरेगांव संचालित

सन्मित्र मंडळ विद्यामंदिर

# सन्मित्र मंडळ, गोरेगांव

## क्षणचित्रे : गत ६० वर्षांची

# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

## सद्यस्थिती



१९५८-२०१८

६०

हीरक महोत्सवी वर्ष

सन्मित्र मंडळ, गोरेगाव.

इवलेसे रोप लावियले द्वारी,
तयाचा वेलू गेला गगनावरी

# सन्मित्र मंडळ, गोरेगांव

गोगटेवाडी, आरे रोड, गोरेगाव (पू), मुंबई - ६३. दू.: २९२७७०११

## कार्यकारी मंडळ

**श्री. विजय विष्णू जोशी**
अध्यक्ष

**श्री. जयंत धुंडिराज विद्वांस**
उपाध्यक्ष

**श्री. प्रशांत सुधाकर आठले**
संयुक्त कार्यवाह

**श्री. प्रकाश गजानन नानिवडेकर**
संयुक्त कार्यवाह

**श्री. अजित वसंत वर्तक**
खजिनदार

**श्री. नारायण गणपत सामंत**
सदस्य

**श्री. नरेन्द्र मुरलीधर पुराणिक**
सदस्य

**सौ. अरुणा सुनिल सप्रे**
सदस्य

**श्री. विलास निलकंठ सोहोनी**
सदस्य

**श्री. निलेश सुधाकर ताटकर**
सदस्य

**श्री. मधुसुदन वखारिया**
सदस्य

# क्षणचित्रे : गत ६० वर्षांची

१९५५ साली गोरेगाव मुंबई शहराचा भाग नव्हते. गोरेगावला स्वतंत्र ग्रामपंचायत होती. वस्ती होती वीस हजारांच्या आसपास. त्या काळी गोरेगावात फळांच्या बागा होत्या, क्वचित कुठे शेती होती आणि गाई-म्हशींचे गोठे होते. पण गोरेगाव हळूहळू वाढत होते. वाढत्या लोकसंख्येला जशी पिण्याचे पाणी, राहायला घर, वैद्यकीय सेवा यांची गरज होती तशीच शैक्षणिक सुविधेची.

ही निकड लक्षात घेऊन १९५८ साली सर्वश्री. ग. भा. कानिटकर, एकनाथ जोशी, दा. वि. सोवनी, डॉ. य. मो. फाटक अशी काही गोरेगावातली स्थानिक मंडळी एकत्र आली आणि त्यांनी सन्मित्र मंडळ, गोरेगावची स्थापना केली. पूर्व प्राथमिकचे वर्ग सुरुवातीला मृणालिनी चिरमुले यांच्या घरात तर नंतर जागा अपुरी पडू लागल्यावर श्री. रामभाऊ नाईक (माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश) यांच्या दोन खोल्यांत चालत असत. पुढे जसजसा काळ गेला तसतशी संस्थेची प्रगती होत गेली. त्या प्रगतीच्या काही टप्प्यांचा हा आढावा -

शाळेला बैरामजी जीजीभॉय यांच्याकडून जागा मिळाली.

त्या जागेवर हळूहळू सन्मित्र मंडळाची स्वत:ची वास्तू उभी राहिली. वास्तू बांधण्यासाठी श्री. स. दि. वैद्य यांनी आर्किटेक्ट आणि सिव्हिल इंजिनियर म्हणून विनामूल्य योगदान दिले. ही वास्तू लोकांच्या दानातून उभी राहिली.

☛ १९६२ - शाळेच्या पहिल्या तुकडीतील १० विद्यार्थ्यांना चौथीच्या परीक्षेसाठी म्युनिसिपल शाळेत पाठविण्यात आले आणि विशेष म्हणजे त्यातील ९ विद्यार्थी हे एकूण बसलेल्या २०० विद्यार्थ्यांमध्ये पहिल्या दहांमध्ये होते.

☛ १९६२ - संस्थेचा माध्यमिक विभाग सुरू झाला.

☛ १९६९ - शाळेची पहिली तुकडी शालान्त परीक्षेला बसली. अजित सत्येंद्रनाथ रेगे हा विद्यार्थी शाळेत पहिला आला.

☛ १९७५ - ज्युनियर कॉलेज प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले. ते एक वर्ष चालले.

☛ १९७८ - प्रथमच शाळेच्या विद्यार्थ्याचे नाव शालान्त परीक्षेत बोर्डाच्या गुणवत्ता यादीत झळकले. सुनील श्रीकृष्ण सप्रे बॉर्डात सातवा आला.

☛ १९८१ - बैरामजी जीजीभॉय प्रा. लि. यांच्याकडून संस्थेला गोरेगाव पूर्वेला ८१५३.५० स्क्वे. मीटरचा प्लॉट मिळाला.

☛ १९८३ - रौप्यमहोत्सवाचा प्रकट कार्यक्रम तत्कालीन महापौर श्री. प्रभाकर पै यांच्या उपस्थितीत साजरा केला.

☛ १९९० - बैरामजी जीजीभॉय प्रा. लि. यांच्याकडून संस्थेला मिळालेल्या ८१५३.५० स्क्वे. मीटरच्या प्लॉटचे आरक्षण महाराष्ट्र सरकारकडून ''सेकन्डरी स्कूल ऍन्ड प्लेग्राउंड'' असे करून घेण्यात

संस्थेला यश  मिळाले. परिणामस्वरूप त्या जागेवर शाळा बांधण्याचा मार्ग मोकळा झाला.

☛ १९९९ – संस्थेचे सभासद श्री. विठ्ठल कृ. पालकर यांनी आपला मुलगा गिरीशच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या रुपये एका लाख देणगीतून आणि सरकारने दिलेल्या रुपये दोन लाख अनुदानातून संगणक कक्षाची सुरुवात झाली. गिरीश आपल्या शाळेचा १९७८ च्या तुकडीचा माजी विद्यार्थी.

☛ २००३ – शाळेत पहिली ते चौथी प्रत्येक वर्गाची एक तुकडी, तर इयत्ता पाचवीपासून प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या होत्या. मुलांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन वर्ष २००३ पासून क्रमश: पहिली ते चौथीच्या दोन तुकड्या करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे २००३ला इयत्ता पहिलीची एक तुकडी वाढवून एकूण दोन तुकड्या करण्यात आल्या. नवीन तुकडीत ५६, तर दोन्ही तुकड्यांमध्ये मिळून ११२ विद्यार्थी होते.

☛ २००४ – इयत्ता आठवीपासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम म्हणजेच गणित व शास्त्र हे दोन विषय इंग्रजीत, तर बाकी सर्व विषय मराठीतच असे शिकवायला सुरुवात केली. पहिल्या वर्षी सेमी इंग्रजीला २२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्याचबरोबर कोणाला सगळे विषय पूर्णपणे मराठीतच शिकायचे असतील तर तीही सोय उपलब्ध करून दिली.

विद्याभारती, अखिल भारतीय शिक्षा संस्थान यांच्याशी संस्था संलग्न झाली. त्या वर्षी संस्थेच्या पूर्वप्राथमिकच्या वर्गात विद्याभारतीच्या शिशुवाटिकेच्या अभ्यासक्रमाप्रमाणे शिकवायला सुरुवात झाली.

☛ २००६ – तन्वी प्रवीण माईणकर शालान्त परीक्षेत मुंबई बोर्डात गुणवत्ता यादीत तिसरी आली. हा आतापर्यंतचा शाळेतील विद्यार्थ्यास बोर्डाच्या गुणवत्ता यादीत मिळालेला सर्वात वरचा क्रमांक आहे. याच वर्षी अन्य दोन विद्यार्थिनी – अपूर्वा कामत, आदिती वालझाडे गुणवत्ता यादीत आल्या.

☛ २००७ – शालेय इमारतीवर तिसरा मजला चढला आणि तिथे एकावेळी पाचशे विद्यार्थी बसू शकतील अशा माधव सभागृहाची निर्मिती झाली.

शाळेतील विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे राहू नये म्हणून शाळा सुटल्यावर संध्याकाळी शाळेतच इंग्रजी संभाषण वर्ग हा एक शालाबाह्य उपक्रम घ्यायचे ठरले. त्याप्रमाणे सौ. मीनल परांजपे यांनी सुरू केलेली शिकवण्याची पद्धत अवलंबत इंग्रजी संभाषण वर्ग सुरू केले. आपल्या पालकांनाच त्या पद्धतीचे प्रशिक्षण दिले आणि त्यांनीच शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवायला सुरुवात केली.

☛ २००८ – माध्यमिकच्या सहाही वर्गखोल्या प्रोजेक्टरयुक्त झाल्या. विद्यार्थ्यांना शिकवताना दृक्–श्राव्य माध्यमाचा उपयोग माध्यमिकचे शिक्षक करू लागले. शाळेत इ–लर्निंग सुरू झाले.

सुवर्णमहोत्सवी वर्षाचा प्रकट कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

☛ २०१२ – महिंद्र आणि महिंद्र कंपनीने दिलेल्या देणगीतून प्रयोगशाळेचे नूतनीकरण केले.

☛ २०१४ – तत्कालीन खासदार आणि विद्यमान रेल्वेमंत्री श्री. पियुष गोयल यांनी त्यांच्या खासदार निधीतून दिलेल्या सुमारे नऊ लाख रुपयातून संगणक–कक्षात ३० संगणक घेण्यात आले. तत्कालीन महापौर श्री. सुनील प्रभू यांनी त्यांच्या खाजगी ट्रस्टमधून दिलेल्या एक लाख रुपयांच्या देणगीतून संगणक–कक्ष वातानुकूलित केला.

☛ २०१५ – शालान्त परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला.

☛ २०१७ – नेहरू सायन्स सेंटर, मुंबईतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत मुंबई–ठाणे येथील शाळा सहभागी होतात. या स्पर्धेचे विजेतेपद जिंकण्याची हॅटट्रिक आपण साधली. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवण्याचे हे सलग तिसरे वर्ष.

☛ २०१८ – एक्सेल क्रॉप केयरने देणगी दिली. ही देणगी 'सन्मित्र मंडळ माजी विद्यार्थी संघ' आणि 'लायन्स क्लब' यांच्या प्रयत्नांतून शाळेला प्राप्त झाली. देणगीतून आपल्याला ९ प्रोजेक्टर्स, ४ लॅपटॉप, हेडफोन्स, इ–लायब्ररी, गणित पेटी, इ–लर्निंग सॉफ्टवेअर मिळाले.

☛ २०१८ – २०१९ संस्थेच्या हीरकमहोत्सवी वर्षाचा प्रकट कार्यक्रम प्रसिद्ध गिर्यारोहक श्री. आशिष माने यांच्या उपस्थितीत, तर सांगता समारोहाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे विद्यमान उच्च शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

**(नारायण ग. सामंत)**
कार्यकारिणी सदस्य
व माजी विद्यार्थी

**(विजय वि. जोशी)**
अध्यक्ष
व माजी शिक्षक

*(१२ सप्टेंबर २०१९)*

●●●

# सद्यस्थिती

साठ वर्षांपूर्वी १२ विद्यार्थ्यांना घेऊन सुरू झालेल्या शाळेत आजची विद्यार्थी संख्या आहे –

| शिशुवाटिका | प्राथमिक | माध्यमिक | एकूण |
|---|---|---|---|
| ९४ | ३०३ | ७१३ | १११० |

आजूबाजूच्या मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. पालकांचा कल आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याचा आहे. या वातावरणाचा परिणाम आपल्यावरही झाला आहे. आपली शिशुवाटिका आणि प्राथमिकची विद्यार्थी संख्या घटली आहे. त्यामुळे, एकूण विद्यार्थी संख्या १,४०० वरुन १,११० पर्यंत खाली आली आहे. माध्यमिकच्या विद्यार्थी संख्येवर परिणाम झालेला नाही. मराठी माध्यमाच्या शाळांना पोषक नसलेल्या आजच्या परिस्थितीचा विचार करता आपली १,११० ही विद्यार्थी संख्या पण चांगलीच म्हणावी लागेल.

**शिक्षक संख्या आहे –**

| शिशुवाटिका | प्राथमिक | माध्यमिक | एकूण |
|---|---|---|---|
| ४ | ११ | १९ | ३४ |

विद्यार्थी संख्या खूप कमी झाल्याने अन्य शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सरकारी नियमांप्रमाणे अतिरिक्त होत आहेत. आपल्या शाळेत अद्याप एकही शिक्षक वा शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त झालेला नाही. उलट, अन्य शाळांतील अतिरिक्त झालेले १२ शिक्षक व ३ शिपाई आतापर्यंत आपण सामावून घेतले आहेत.

**शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या आहे –**

| मंडळ | शिशुवाटिका | प्राथमिक | माध्यमिक | एकूण |
|---|---|---|---|---|
| ३ | ३ | २ | ५ | १३ |

६० वर्षांपूर्वी छोट्याशा जागेत सुरू झालेली शाळा आज स्वत:च्या तीन मजली इमारतीत आहे. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी ११ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. त्याशिवाय शिक्षक कक्ष, वातानुकूलित अद्ययावत संगणक कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय, तळमजल्यावर छोटे, तर तिसऱ्या मजल्यावर मोठे सभागृह आहे. मोठ्या सभागृहात एकावेळी ५०० विद्यार्थी बसू शकतात. सर्व वर्गखोल्यांमध्ये तसेच सभागृहांमधे प्रोजेक्टर्सची व्यवस्था आहे. शाळेच्या छोट्याशा आवारात सिमेंटचा कोबा केला असून ते विद्यार्थ्यांना खेळायला उपलब्ध आहे. आवारातच कायमस्वरूपी स्टेज आहे.

**शिक्षणपद्धती –**

शिशुवाटिका – विद्याभारती, 'अखिल भारतीय शिक्षा संस्थान' या संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार, आपण विद्यार्थ्यांना शिकवतो. ह्या पद्धतीत, इतक्या लहान वयात विद्यार्थ्यांवर वाचन – लेखनाचा बोजा टाकलेला नसून, त्याच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासाकडे लक्ष दिले आहे. तीन तास चालणाऱ्या वर्गात, वेळापत्रक आखून, घेतलेल्या कृतियुक्त सत्रांमधून, विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास होत जातो. हे कसे साध्य करायचे यासाठी, आपण शिक्षिकांचे सतत प्रशिक्षण करत असतो. देशभरात चालणाऱ्या विद्याभारतीच्या शेकडो शिशुवाटिकांमधील चांगल्या शिशुवाटिकांमधील एक म्हणून आपल्या शाळेच्या शिशुवाटिकेची गणना होते.

**प्राथमिक** – आनंददायी शिक्षण, हसत–खेळत शिक्षण, लहान वयात मिळायला हवे असेल तर, विद्यार्थ्याला शाळेत एका जागी खिळवून ठेवणे योग्य नाही. त्याला मुक्त वातावरणात शिकू दिले पाहिजे. आपल्या प्राथमिकच्या कोणत्याही वर्गात बाके नाहीत. मुलांना वर्गात मुक्तपणे वावरता येते. आधुनिक संशोधनानेही हे आता सिद्ध झाले आहे की, मुले मुक्त वातावरणात उत्तम रीतीने शिकतात. त्यांच्या बुद्धीच्या विकासाला असे वातावरण पोषक असते. या बरोबरच मुलांच्या पालकांशीही समन्वय ठेवला जातो. अशा वातावरणात मुले आपला पहिली ते चौथीचा अभ्यासक्रम आनंदाने पूर्ण करतात.

**माध्यमिक** – इयत्ता वाढते तसा अभ्यासही वाढत जातो. अशा वेळी शिकवण्याची पद्धत विद्यार्थिकेंद्री हवी आणि शिक्षक हा सुलभक असावा. अभ्यास विद्यार्थ्याने करायचा असून, जिथे आवश्यक असेल तिथे शिक्षकाने त्याला शिकण्यासाठी साहाय्य करावे. आपल्या शाळेत हीच ज्ञानरचनावादी पद्धत अवलंबली जाते. वाढत्या अभ्यासातही उत्तम परिणाम प्राप्त करायचे असतील तर विद्यार्थ्याला जो धडा शिकायचा आहे, तो त्याने दृक्–श्राव्य माध्यमातून बघितला, तर तो आत्मसात करायला सोपे जाते, हे लक्षात घेऊन आपल्या शाळेत इ–लर्निंगची व्यवस्था केली आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणजे गेली कित्येक वर्षे आपला शालान्त परीक्षेचा निकाल सातत्याने ९० टक्क्यांवर राहिला आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे पोषक वातावरण शाळेत निर्माण झाले आहे.

**मंडळ** – अभ्यासाबरोबरच चांगले संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत, त्यांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी, भावी आयुष्यात वैयक्तिक उन्नती साधताना त्यांनी सामाजिक भानही ठेवावे, त्यांच्यातून चांगले नागरिक घडावेत याकडे लक्ष देणे, ही तर आपल्या संस्थेची खासियत! विद्यार्थ्यांना शिकायला मदत होईल अशी भौतिक साधने उपलब्ध करून देत असताना, संस्था वरील गोष्टींकडेही लक्ष देते. आपल्या शिशुवाटिकेपासून दहावीपर्यंतच्या वर्गात विविध सण – उत्सव साजरे केले जातात. सामाजिक भान कसे ठेवायचे याची विद्यार्थ्यांना विविध प्रसंगी जाणीव करून दिली जाते. विद्यार्थी 'संस्कृतिज्ञान परीक्षे'ला बसतात. विविध स्तोत्र विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेतली जातात. परिणामस्वरूप आज शाळेच्या कित्येक विद्यार्थ्यांनी वैयक्तिक आयुष्यात मोठे होत असतानाच, सामाजिक बांधिलकीदेखील जपली आहे.

**(प्रकाश ग. नानिवडेकर)**
संयुक्त कार्यवाह

**(प्रशांत सु. आठले)**
संयुक्त कार्यवाह

*(१२ सप्टेंबर २०१९)*

●●●

# हीरक महोत्सवी वर्ष

या वर्षीचा अहवाल आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. ह्या वर्षी आपल्या संस्थेने ६० वर्षं पूर्ण केली. २०१८-२०१९ हे वर्ष सन्मित्र मंडळ, गोरेगावचे हीरक महोत्सवी वर्ष म्हणून आपण साजरे केले. हीरक महोत्सवी वर्षानिमित्त काही विशेष कार्यक्रम केले. ह्या विशेष कार्यक्रमांची माहितीही ह्या वर्षीच्या अहवालात आहे. कळायला सोयीचे व्हावे म्हणून हा अहवाल दोन भागांत विभागला आहे.-

- ◆ हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा अहवाल
- ◆ अन्य नेहमीच्या, पण महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचा अहवाल

हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेले विशेष कार्यक्रम:

हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना प्रामुख्याने खालील गोष्टी कराव्यात असे वर्षांच्या सुरुवातीलाच नक्की केले होते -

**१. शिक्षक प्रशिक्षण**

**२. विविध स्पर्धांचे आयोजन**

**३. एक मोठा प्रकट कार्यक्रम**

**४. व्यापक जनसंपर्क**

**१. शिक्षक प्रशिक्षण** -

''शिक्षक जर चांगले प्रशिक्षित झाले, ते जर सर्व दृष्टींनी स्वस्थ असतील तर विद्यार्थी चांगले घडू शकतात,'' हे सूत्र डोळ्यांसमोर ठेवून शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी, त्यांच्या स्वास्थ्यासाठी त्यांच्या कौशल्य विकासासाठी तज्ज्ञांची भाषणे / कार्यशाळा यांचे आयोजन वर्षभरात केले.

❖ **योग प्रशिक्षण कार्यशाळा** - शाळा सुरू होताहोताच आला योगदिन. या योगदिनाचे औचित्य साधून दिनांक २१ जून २०१८ रोजी शाळेतील सर्व महिला शिक्षकांसाठी सुमारे तीन तासांची योग कार्यशाळा 'योग विद्या निकेतन' ह्या संस्थेतर्फे झाली. याचा जसा शिक्षकांना आपल्या व्यक्तिगत आयुष्यात फायदा होणार होता, तसाच विद्यार्थ्यांनाही. कार्यशाळेत विद्यार्थीपयोगी आसने त्यांनी शिक्षकांना शिकवली, जी शिक्षक विद्यार्थ्यांकडून करवून घेऊ शकतील. 'योग विद्या निकेतन'चे ७ ते ८ कार्यकर्ते कार्यशाळेत उपस्थित होते. 'योग विद्या निकेतन'चे अध्यक्ष, शल्यचिकित्सक, यूरॉलॉजिस्ट आणि आपले माजी विद्यार्थी डॉ. श्रीकांत बडवे यांच्यामार्फत ह्या 'योग कार्यशाळे'चे आयोजन झाले. डॉ. बडवे या कार्यशाळेदरम्यान बराच वेळ शाळेत उपस्थित होते.

❖ **शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा** – दिनांक १० जुलै २०१८ रोजी दुसरी कार्यशाळा दुपारी ११ ते ३.४५ या वेळेत झाली. यात शिशुवर्ग ते दहावीचे सगळे शिक्षक सामील झाले होते. कार्यशाळेचे उद्‌घाटन सौ. साखळकर (M.A. in Education, B.Ed., Masters in Guidance & Counselling) यांनी केले. स्वत:च्या हीरक महोत्सवी वर्षात संस्था शिक्षक प्रबोधनाचे असे कार्यक्रम करत असल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. कार्यशाळा श्री. दिलीप बेतकेकर (निवास गोवा, चार विषयांत एम्.ए., उपाध्यक्ष, विद्याभारती, अखिल भारतीय शिक्षण संस्थान) यांनी घेतली.

शिक्षकांचे स्वत:चे राहणे कसे आनंदी असावे, त्यांचा आपल्या सहकारी शिक्षकांबरोबरचा संवाद कसा मैत्रीपूर्ण असावा, वर्गात जाण्यापूर्वी शिक्षकाने काय काय आणि नेमकी कशी तयारी करावी, त्यासाठी कोणती पुस्तके आज उपलब्ध आहेत, प्रत्यक्ष शिकवताना कसे शिकवावे, आपली स्वत:ची शैक्षणिक कौशल्ये कशी विकसित करावीत, शिक्षकाने स्वत:चे मन स्थिर आणि शांत कसे करावे या आणि अशा एक ना अनेक गोष्टींबद्दल मार्गदर्शन करीत कार्यशाळा पुढे पुढे जात होती. हे सर्व मार्गदर्शन श्री. दिलीपरावांनी आपल्या भाषणातून नाही, तर शिक्षकांबरोबर घेतलेल्या कृतिसत्रांतून केले. कार्यशाळेविषयी मनोगत व्यक्त करताना शिक्षकांनी अशा कार्यशाळा ठरावीक अवधीनंतर परत परत व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

❖ **संगणक प्रशिक्षण वर्ग** – शिक्षकांच्या दैनंदिन कामातील संगणकाची अपरिहार्यता लक्षात घेऊन ३१ ऑगस्ट २०१८ रोजी संस्थेचे खजिनदार, संगणकतज्ज्ञ, व कन्सल्टंट श्री. अजित वर्तक यांनी शिक्षकांसाठी संगणक प्रशिक्षण वर्ग घेतला. ह्या वर्गात त्यांनी खालील विषय मांडले–

संगणकाची मूलभूत माहिती, डेटा ऑर्गनाइज असावा ह्या दृष्टीने फाईल / फोल्डर स्ट्रक्चर / शॉर्टकट, दैनंदिन कामात संगणकातील प्रोग्रॅम्सचा अधिक प्रभावी वापर कसा करावा, डेटा प्रोसेसिंग, डेटा ॲनालिसिस आणि रिपोर्टिंग, शालेय कार्यक्रमाचे वृत्तकथन प्रभावीपणे करण्यासाठी छायाचित्र व वर्ड प्रोग्रॅमचा वापर, देवनागरीतील लिखाणासाठी युनिकोडचा वापर, त्याचे पी.डी.एफ.मध्ये रूपांतर करणे, मोबाइल ॲप्लिकेशनचे इंटिग्रेशन –व्हॉट्स ॲप वेबचा वापर. शेवटची १५ मिनिटे प्रश्नोत्तरे. अशी एकूण दोन तास कार्यशाळा झाली.

❖ **अर्थनियोजन मार्गदर्शन** – शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात उपयोगी होईल असा एक उपक्रम आपण आयोजित केला होता. तो म्हणजे – अर्थनियोजन मार्गदर्शन. मंडळाचे उपाध्यक्ष आणि 'अर्थनियोजन' या विषयातले तज्ज्ञ श्री. जयंत विद्वांस यांनी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी त्या विषयावर सुमारे तीन तास मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी स्वत:च्या मिळकतीची गुंतवणूक कशी करावी, ज्यायोगे त्यापासून स्वत:ला जास्तीत जास्त फायदा कसा होईल, हे दृक्–श्राव्य माध्यमाचा उपयोग करून समजावून सांगितले.

**२. विविध स्पर्धांचे आयोजन –**

❖ **माध्यमिक विभाग** – दिनांक २३ नोव्हेंबर २०१८ ते २९ नोव्हेंबर २०१८ ह्या सात दिवसांत

एकूण पाच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात सहा शाळांनी सहभाग घेतला. वक्तृत्व, समूहगान, चित्रकला, विज्ञान प्रश्नमंजुषा (मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम) आणि निबंध स्पर्धा या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

❖ **प्राथमिक विभाग** – गोरेगाव–मालाडमधील शाळांशी संपर्क करून प्राथमिकने विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर स्पर्धा आयोजित केल्या –

❖ **कोलाजकाम स्पर्धा** – प्राथमिक विभागाची पहिली स्पर्धा रविवार दिनांक २८.१०.२०१८ रोजी ११.३० ते १.३० या वेळेत झाली. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा होती. स्पर्धेत मालाडच्या पाच आणि गोरेगावच्या चार अशा एकूण नऊ शाळांनी सहभाग घेतला.

❖ **आंतरशालेय रनिंग डिक्टशन स्पर्धा** – इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा होती. रविवार दिनांक २५ नोव्हेंबर २०१८ रोजी माधव सभागृहात ११.३० ते १.३० या वेळेत ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेत एकूण नऊ शाळांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे स्वरूप – एका वेळी स्पर्धेच्या ठिकाणी तीन शाळांच्या जोड्या घेण्यात आल्या. जोडीतील एकाने धावत जाऊन यादीतील शब्द पाहून यायचे आणि आपल्या जोडीदाराला सांगायचे आणि जोडीदाराने ते न चुकता पटापट लिहायचे. तीन मिनिटांत स्पेलिंग न चुकवता जास्तीत जास्त शब्द लिहिणाऱ्या विजेत्या तीन जोड्या निवडायच्या.

❖ **देशभक्तीपर समूह गीतगायन स्पर्धा** –

दिनांक २ डिसेंबर रोजी देशभक्तीपर समूह गीतगायन स्पर्धा विद्यार्थी आणि शिक्षक गटासाठी आयोजित करण्यात आली. त्यात मालाड व गोरेगाव विभागातील नऊ शाळांनी भाग घेतला. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून दोन संगीततज्ज्ञांना बोलावण्यात आले होते. श्री. प्रणव मोडक आणि श्री. बेलोसे यांनी परीक्षकांची भूमिका उत्तम बजावली. स्पर्धेच्या बक्षीस समारंभाच्या वेळेस श्री. प्रणव मोडक यांनी गीतरामायणातील गीतं गाऊन सगळ्यांना मंत्रमुग्ध केले.

### ३. एक मोठा प्रकट कार्यक्रम –

दिनांक १६ डिसेंबर २०१८ला आपण एक भव्य स्नेहसंमेलन आयोजित केले होते. १,११० विद्यार्थी, त्यांचे पालक, आजी–माजी शिक्षक, मंडळाचे सभासद, गोरेगावातील आणि आजूबाजूच्या शैक्षणिक संस्थांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, सामाजिक कार्यकर्ते, इतर मान्यवर आणि लोकप्रतिनिधी असे जवळपास २,४०० जण ह्या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा कार्यक्रम गोरेगावातील संभाजी मैदानावर साजरा झाला.

प्रवेशद्वाराशी मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी काढलेल्या सुंदर रांगोळ्या सजल्या होत्या. निमंत्रितांचे स्वागत करण्यास शिक्षक आणि पालक गुलाबजल / अत्तर – पुष्प घेऊन सज्ज होते. कार्यक्रमाची सुरुवात संध्याकाळी ५.३० वाजता मंडळाचे सर्व कार्यकारिणी सदस्य आणि प्रमुख अतिथी श्री. आशिष माने (सुप्रसिद्ध व नामवंत गिर्यारोहक), निवास पुणे, यांनी दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करून केली. सोबत

प्रार्थना झाली. प्रमुख अतिथींचे स्वागत व सत्कार झाला. सोबत विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. प्रमुख पाहुणे श्री. आशिष माने यांनी त्यांच्या यशस्वी एव्हरेस्ट मोहिमेबद्दल माहिती सांगून मुलांमध्ये एक नवचैतन्य निर्माण केले. संस्थेचे अध्यक्ष व सन्मित्र मंडळ विद्या मंदिरचे माजी शिक्षक श्री. विजय जोशी यांनी संस्थेच्या इतिहासाची आठवण करून देत संस्थेची पुढील वाटचाल कशी असेल ह्याचे चित्र रेखाटले. त्यांनी आपल्या भाषणानंतर संस्थेचे संकेतस्थळ **www.sanmitramandal.org** लाँच केले. या वेबसाइटची संकल्पना साकार केली आपले माजी विद्यार्थी श्री. अमेय पेडणेकर यांनी, तर वेबसाइट बनवली श्री. दीपक जाधव यांनी. श्री. मेघनाथ गणपुले यांनी या वेबसाइटसाठी शाळेत पूर्ण छायाचित्रण केले.

हा सोहळा संस्मरणीय केला तो विद्यार्थ्यांनी. त्यांनी एकूण पाच तास विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नूतन शिशूच्या वय वर्ष ३ ते इयत्ता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांपर्यंत एकूण ५५० विद्यार्थी, सर्व शिक्षक, मंडळाचे कर्मचारी व निवडक पालक ह्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांनी गायन, नृत्य, तबला जुगलबंदी, सामूहिक गायन, छोटे स्किट, त्याला जोडून संगीत नृत्य अशा एकूण ३१ कार्यक्रमांची मेजवानी दिली.

कार्यक्रमाचे निवेदन शाळेच्या माजी विद्यार्थी सौ. माधुरी देवधर (आकाशवाणी, मुंबई एफ.एम. वाहिनीसाठी मुक्तछंद लेखन, निवेदन व दिग्दर्शन करतात) व शाळेच्या आजी विद्यार्थ्यांनी मिळून केले.

माजी विद्यार्थ्यांना तसेच संख्येच्या मर्यादेमुळे सर्व पालकांना व गोरेगावातील सगळ्या हितचिंतकांना प्रत्यक्ष कार्यक्रमाला बोलावणे शक्य नव्हते. तसेच माजी शिक्षकांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे किंवा परदेशात असल्यामुळे खूप इच्छा असूनही हा कार्यक्रम बघता येणार नव्हता. हे सर्व लक्षात घेऊन हा कार्यक्रम यू-ट्यूबवर लाइव्ह प्रक्षेपित केला. ही जबाबदारी तुषार कांबळी या माजी विद्यार्थ्याने तसेच श्री. रामस्वामी व 'लिंक बियॉन्ड' यांनी लीलया पेलली. जगभरातील माजी शिक्षक व विद्यार्थ्यांनी ह्या कार्यक्रमाचा नुसताच आस्वाद घेतला असे नाही, तर तत्परतेने उत्स्फूर्त प्रतिसादही दिला. (२४ तासांच्या आत ह्या चित्रफितीला ९०० सबस्क्रिप्शन आणि ७,५९० च्या वर views मिळाले.) त्यानिमित्त आपण यू-ट्यूबवर आपल्या नावाचे खाते उघडले आहे. इथे हा पूर्ण कार्यक्रम आजही बघता येतो.

ह्या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यांपैकी काहींचा उल्लेख अपरिहार्य आहे. 'विद्याभारती' ह्या शैक्षणिक संस्थेचे अखिल भारतीय सह-संघटन मंत्री आणि शिक्षण क्षेत्रातील पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. श्रीरामजी आरावकर, महाराष्ट्र राज्याच्या माननीय मंत्री श्री. विद्याजी ठाकूर, रा. स्व. संघ कोकण प्रांताचे कार्यवाह आणि सन्मित्रचे सभासद श्री. सुनिलजी सप्रे, विद्याभारती कोकण प्रांताचे संघटनमंत्री श्री. भाई उपालेजी, प्रसिद्ध यूरॉलॉजिस्ट आणि आपले सभासद श्री. श्रीकांतजी बडवे, विद्यमान नगरसेवक आणि आपले माजी विद्यार्थी श्री. स्वप्निलजी टेंबवलकर हे मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

शाळेचे माजी विद्यार्थी व स्थानिक नगरसेवक श्री. स्वप्निल टेंबवलकर यांनी या कार्यक्रमासाठी संभाजी मैदान मिळवून देण्यात मोलाचा हातभार लावला. कार्यक्रमाचा मंच, ध्वनी, प्रकाश व मैदानावरील

अन्य आवश्यक व्यवस्था माजी विद्यार्थी प्रसाद वालावलकर यांच्या 'साई डेकोरेटर्स'ने सांभाळल्या. कार्यक्रमाचे पूर्ण चित्रीकरण व स्क्रीनवरील प्रक्षेपण संस्थेचे हितचिंतक महेश निवाते यांनी केले. शाळेचे माजी विद्यार्थी राहुल व स्वप्निल काळे (दत्त स्नॅक्स) ह्यांच्या सहयोगाने सर्व उपस्थितांना चटपटीत अल्पोपहार मिळू शकला. ठाणे जनता सहकारी बँक, जनकल्याण बँक, सारस्वत बँक आणि नॉव्हेल्टी स्टोअर्सचे श्री. प्रवीणभाई सावला ह्यांनी या कार्यक्रमासाठी थोडे आर्थिक पाठबळ दिले.

संस्थेचे संयुक्त कार्यवाह श्री. प्रशांत आठले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात हातभार लागलेल्या सगळ्यांचे आभार मानले. आभार प्रदर्शन सुरू असताना माजी विद्यार्थी प्रथमेश कोंडेकर याने (मान्यवरांना दिलेल्या स्मृतिचिन्हाच्या छायाचित्रांची) तयार केलेली चित्रफीत स्क्रीनवर दाखवण्यात आली. रा. स्व. संघाचे जयप्रकाश नगरचे कार्यवाह श्री. दीपक मयेकर यांच्या सुरेल आवाजातील संपूर्ण वंदेमातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाची मुख्य धुरा जरी श्री. नारायण सामंत, श्री. नरेंद्र पुराणिक हे शाळेचे माजी विद्यार्थी व संस्थेचे खजिनदार श्री. अजित वर्तक तसेच संस्थेचे व्यवस्थापक श्री. प्रफुल्ल कोंडेकर यांनी सांभाळली असली तरी संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, तिन्ही विभागांचे मुख्याध्यापक सौ. नंदिनी भावे, सौ. वैशाली सावंत, श्री सिद्धार्थ गव्हाळे, माध्यमिकच्या पर्यवेक्षक सौ. रेखा मोरे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांनी महिनाभर केलेले परिश्रम व पालकांचा सक्रिय सहभाग व सहकार्य यामुळेच हा भव्य कार्यक्रम यशस्वी व संस्मरणीय ठरू शकला.

**माजी विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण**

सन्मित्र मंडळ, गोरेगाव व सन्मित्र मंडळ माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सन्मित्रच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण दिनांक ०६ जानेवारी २०१९ला आरे येथील न्यूझीलंड हॉस्टेलच्या मैदानावर करण्यात आले. हा कार्यक्रम जरी संयुक्त विद्यमाने घेण्यात आला, तरी तो यशस्वी करण्यासाठी, माजी विद्यार्थी संघाच्या कार्यकर्त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.

दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात सकाळी खेळ व माजी विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम झाले. दुपारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार झाला; तर संध्याकाळी श्री. श्रीधर फडके यांच्या संगीत संध्येची मेजवानी होती. कार्यक्रमाला जवळपास २००० माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली होती, हे या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य! परदेशातील अनेक माजी विद्यार्थ्यांनी या सोहळ्याला खास हजेरी लावली होती. शाळा सुरू झाल्यापासूनचे (१९६९, ११वी एस्.एस्.सी.) प्रत्येक वर्षाचे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमात आजी-माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांपैकी जे दिवंगत झाले आहेत, त्यांचे नातेवाईक आवर्जून उपस्थित होते. समाजात लक्षणीय कामगिरी केलेल्या पंचवीसहून अधिक माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते आदरणीय शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. विविध समित्यांमधील कामे स्वखुशीने करण्यासाठी दीडशे माजी विद्यार्थ्यांच्या टीमने एकदिलाने लावलेला हातभार, हे या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य!



दि. २१.६.२०१८ च्या योगदिनानिमित्त शिक्षिकांना
योग प्रशिक्षण देताना, योग विद्या निकेतनचे कार्यकर्ते.
त्यांचे अध्यक्ष डॉ. बडवे पण कार्यक्रमाला उपस्थित होते.



दि. १०.०७.२०१८ 'शिक्षण प्रशिक्षण कार्यशाळा' कृतीयुक्त
सत्राद्वारे घेताना - विद्याभारतीचे अखिल भारतीय उपाध्यक्ष
श्री. दिलिपराव बेतकेकर



दि. ३१.०८.२०१८ शिक्षकांसाठी संगणक प्रशिक्षण वर्ग - संगणकाचा
योग्य वापर केल्याने दैनंदिन कार्यात कशी मदत होवू शकते. ते
शिक्षकांना सांगाताहेत संस्थेचे खजिनदार आणि ह्या विषयातले तज्ज्ञ
श्री. अजित वर्तक.



'अर्थनियोजन मार्गदर्शन' - मंडळाचे उपाध्यक्ष आणि
ह्या विषयातले तज्ज्ञ श्री. जयंत विद्वांस शिक्षकांना
संबोधित करताना





हीरक महोत्सवी वर्षानिमित्त
घेतलेल्या आंतर्शालेय स्पर्धेत सहभागी
विद्यार्थी व त्यांना प्रोत्साहन
द्यायला उपस्थित पालक

दि. १६ डिसेंबर २०१८ च्या स्नेहसंमेलनाला लाभलेले
प्रमुख पाहुणे नामवंत गिर्यारोहक श्री. आशिष माने
उपस्थितांना संबोधित करताना.



**प्रमुख पाहुणे - कार्यकारी मंडळाबरोबर.**
डावीकडून उजवीकडे सर्वश्री सामंत, सोहोनी, वर्तक, पुराणिक,
प्रमुख पाहुणे आशिष माने, जोशी, वखारिया (बैरामजी जीजीभॉय यांचे प्रतिनिधी),
विद्वांस, नानिवडेकर, आठले, ताटकर व सौ. सप्रे.



# सन्मित्र मंडळ, गोरेगांव

# स्नेहसंमेलन



शिशुवाटिकेतील विद्यार्थी
नृत्य सादर करताना



स्नेहसंमेलनाला लाभलेला
प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद...



भव्य व्यासपीठावर सादरीकरण
करताना विद्यार्थी



रात्र झाली तरी रसिकपणे कार्यक्रमांचा
आस्वाद घेणारा प्रेक्षक वर्ग

# शाळेची सद्यस्थिती



सुसज्ज प्रयोगशाळेत विद्यार्थी सूक्ष्मदर्शक वापरताना



३० संगणक युक्त कक्षात, विद्यार्थी धडे घेताना



दृक्‌श्राव्य माध्यमाचा (प्रोजेक्टरचा) उपयोग करून
विद्यार्थ्यांना शिकायला मदत करताना शिक्षक



'माधव' सभागृह

**४. व्यापक जनसंपर्क**

'सन्मित्र'विषयी आस्था, आपुलकी असलेला एक मोठा वर्ग आज समाजात आहे. आजी–माजी शिक्षक, पालक, विद्यार्थी, तसेच रा. स्व. संघ व समविचारी संस्थांचे कार्यकर्ते आणि अन्य कारणाने सन्मित्रच्या संपर्कात आलेले हे नागरिक आहेत. ह्या सगळ्यांशी वर्षभरातील कार्यक्रमांच्या निमित्ताने व अन्य वेळीही संपर्क साधण्यात आला. माध्यमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. उपाध्ये सर व अन्य काहींशी संपर्क साधण्यास मंडळ सदस्य श्री. नरेंद्र पुराणिक व श्री. अजित वर्तक पुण्यास जाऊन आले.

ठरविलेल्या वरील गोष्टींव्यतिरिक्त काही गोष्टी ह्या वर्षभरात केल्या, त्याचा हा संक्षिप्त वृत्तान्त –

**अन्य कार्यक्रम / उपक्रम :**

शालेय वर्ष सुरू होता होताच 'डि लिंक इंडिया लि.'ने सामाजिक उत्तरदायित्व निधी (**CSR** कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अंतर्गत शाळेतील सगळ्या विद्यार्थ्यांना वह्यांचे विनामूल्य वाटप करण्यासाठी सात लाखांची देणगी दिली. त्या देणगीतून शाळेतील सर्व (सुमारे एक हजार) विद्यार्थ्यांसाठी त्यांना लागणाऱ्या सुमारे २८,००० वह्यांचे वाटप आपण विनामूल्य केले. उरलेल्या पैशातून आपण आपले शालेय आवाराचे सपाटीकरण करून ते विद्यार्थ्यांना खेळण्यास योग्य केले.

मंडळातर्फे दिनांक ३१ ऑगस्ट २०१८पासून शाळेतील सर्व १,११० विद्यार्थ्यांचा एक वर्षाचा अपघात विमा 'न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी लि.'तर्फे काढण्यात आला. त्यात प्रति विद्यार्थी ओपीडी रु. १०,००० तर रुग्णालयात दाखल केल्यास प्रति विद्यार्थी रु. १,००,००० पर्यंत खर्च परत मिळू शकतो. ह्या विम्याच्या हप्त्याचे पूर्ण पैसे मंडळाला १९९२च्या बॅचच्या 'दहावी ब' या वर्गाने दिले.

हीरक महोत्सवी वर्षाची स्मृती मनात कायम ताजी राहावी म्हणून आपण एक स्मृतिचिन्ह तयार केले. त्या स्मृतिचिन्हाची संकल्पना आपले माजी विद्यार्थी श्री. तुषार कांबळी यांची आहे; तर प्रत्यक्ष स्मृतिचिन्हे आपल्याला माजी विद्यार्थी श्री. सुहास सावंत यांनी बनवून दिली. ही स्मृतिचिन्हे आपण सन्मित्रचे सर्व सभासद, सर्व आजी–माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि काही मान्यवरांना दिली.

हीरक महोत्सवी वर्षात विद्यार्थ्यांनाही काही आनंददायी मिळावे म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१८ रोजी शिशुवाटिका आणि प्राथमिकची वर्षासहल संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली येथे गेली होती.

रविवार दि. १७ मार्च २०१९ रोजी संस्थेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या वतीने 'बालविकास साहित्य प्रदर्शना'चे आयोजन करण्यात आले. पूर्वप्राथमिक ते दहावीच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांचे आकलन नीट व्हावे म्हणून शिक्षक जी विविध शैक्षणिक साधने वापरतात, त्यांची मांडणी प्रदर्शनात करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कुमारी आर. पद्मश्री कृष्णमूर्ती राव यांच्या शुभहस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळी ठीक साडेदहा वाजता 'बालविकास साहित्य प्रदर्शना'निमित्त आयोजित खास सभेची सुरुवात कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व निमंत्रित, मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रमुख अतिथी कुमारी आर. पद्मश्री कृष्णमूर्ती राव यांनी आपल्या भाषणात मराठी

भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याची का आवश्यकता आहे, याचे महत्त्व विशद केले. त्याचबरोबर आपण आपल्या मराठी शाळा, मराठी भाषा, मराठी संस्कृती जर टिकवू शकलो नाही तर त्याने आपल्या जीवनावर किती वाईट परिणाम होऊ शकतील, हे सांगितले. मातृभाषेचे महत्त्व विशद करताना त्यांनी अनेक पाश्चिमात्य भाषातज्ज्ञ, इतिहासकार यांनी मातृभाषेसंबंधी जे विचार मांडले त्याचे दाखले दिले. कार्यक्रमासाठी विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, शाळेचे, संस्थेचे हितचिंतक आवर्जून उपस्थित होते.

दुपारनंतर विविध संस्थांचे प्रतिनिधी, पालक, शिक्षक, संस्थेचे, शाळेचे हितचिंतक यांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संध्याकाळपर्यंत शिक्षणक्षेत्राशी संबंधित जवळजवळ ३०० मान्यवरांनी व इतर ६०० व्यक्तींनी प्रदर्शनाला भेट दिली. सदर उपक्रमाचे कौतुक केले. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या विशेष मान्यवरांमध्ये 'मराठी शाळा वाचवा' या फेसबुक ग्रुपचे संस्थापक मा. श्री.प्रमोद गोखले आणि 'समर्थ भारत गर्भसंस्कार केंद्रा'चे डॉ. अभय शाह यांचा समावेश होता. पालक, विद्यार्थी यांनी प्रदर्शन पाहण्यासाठी संध्याकाळी सहानंतर गर्दी केली, पण वेळेचे बंधन लक्षात घेऊन सायंकाळी प्रदर्शनाची सांगता झाली. शिक्षक, संस्थाचालक, पालक, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा उपक्रम अविस्मरणीय ठरला.

हीरक महोत्सवी वर्षाचा सांगता समारोह रविवार, दि. २३ जून २०१९ला महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री. विनोदजी तावडे यांच्या उपस्थितीत शालेय इमारतीत माधव सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमास संस्थेचे सभासद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि हितचिंतक असे सुमारे १५०जण उपस्थित होते. श्री. विनोदजींनी संस्थेच्या ६० वर्षांच्या यशस्वी वाटचालीविषयी संस्थेचे कौतुक केले.

●●●

# वार्षिक अहवाल :

## एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ मधील
## अन्य नेहमीच्या पण महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचा अहवाल

मागील सर्वसाधारण सभा ३० सप्टेंबर २०१८ रोजी झाली होती.

**नूतन शिशु मंदिर (पूर्व प्राथमिक विभाग) :**

१ मे २०१८ ते १३ मे २०१८ या कालावधीत झालेल्या विद्याभारतीच्या प्रशिक्षण वर्गास आपल्या शाळेच्या सौ. प्राचीताई केळकर, सौ. युक्ताताई मोरे व सौ. जयश्रीताई उंडे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होत्या.

दरवर्षीप्रमाणे प्रथमदिनोत्सवाच्या तयारीसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ८ जून रोजी शाळेत हजर झाले व त्यांनी फुगे, तोरणं, पताका आणि रांगोळ्यांनी शाळा सजवली. दि.१४ जून रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान होम-हवन करून प्रथमदिनोत्सव साजरा करण्यात आला. तिलक करून पेढे देऊन, अत्तर लावून मुलांचे व पालकांचे स्वागत करण्यात आले. वंदना आणि होम-हवन झाल्यावर संस्थाचालकांच्या हस्ते मुलांना पिशवी व डबा यांचे वाटप करण्यात आले. वर्षभराचा अभ्यासक्रम व इतर सूचना देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

२०१८-२०१९ करिता ५ आचार्य व ३ मावश्या कार्यरत होत्या. शनिवारी शिक्षकांची कामाची वेळ दुपारी ११ ते २ अशी होती. या वर्षी ऋतूंची नावे वेगवेगळ्या गटांना देण्यात आली होती.

प्रभात वर्गात नवीन प्रवेश घेणाऱ्या मुलांचा विद्यारंभ-संस्कार २७ जुलै २०१८ला नागपंचमीच्या दिवशी घेण्यात आला. नंतर ११ सप्टेंबरपासून प्रभात वर्गाची शाळेची वेळ साडेतीन तास करण्यात आली.

नेहमीप्रमाणे सर्व हिंदू सण पारंपरिक पद्धतीने साजरे करून आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना व पालकांना करून दिली गेली. दर महिन्याच्या पौर्णिमेला होम करून त्या त्या महिन्यातील मुलांचे वाढदिवस एकत्रित साजरे केले गेले.

भारतमाता पूजन, मातृदिन, निसर्गपूजा हे विशेष कार्यक्रम शाळेत श्रावण अमावास्येला साजरे केले.

१४ जुलै रोजी एक दिवसीय पालक कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांचे आई, वडील दोघेही उपस्थित होते. 'विद्याभारती'चे अखिल भारतीय उपाध्यक्ष श्री. दिलीपराव बेतकेकर यांनी मुलांच्या संगोपनाचे वेगवेगळे मुद्दे सांगून आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या यांची जाणीव पालकांना करून दिली.

शाळेच्या हीरक महोत्सवानिमित्त शिशुवर्गाच्या मागील बाजूस असलेली कुंपणाची भिंत विद्यार्थी, पालकांच्या मदतीने शिक्षकांनी स्वत: हाताने सुंदर चित्रे काढून सुशोभित केली.

डिसेंबर महिन्याच्या शेवटी भातुकली हा कार्यक्रम साजरा केला. यात सगळ्या मुलांनी बटाटे सोलणे, चिरणे, कोथिंबीर निवडणे, मटार सोलणे, ताक घुसळणे, कणीक मळणे, लाट्या करणे, पुऱ्या लाटणे,

जेवण वाढणे, भांडी घासणे ह्या जीवनव्यवहारातील क्रियांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

प्रभात वर्गातील मुलांनी शाळेत निवास केला. खेळ, गाणी, गोष्टी, निसर्ग–भेट, ध्यानसत्र, भोजन व रात्री शेकोटी झाल्यावर मुलं झोपी गेली व सकाळी भक्तिगीतांच्या आवाजाने उठून, हसत, आनंदाने आपल्या आई–बाबांबरोबर शिबिराचे अनुभव सांगत आपापल्या घरी गेली.

दरवर्षीप्रमाणे बालदिन सप्ताहाचे आयोजन ७ जानेवारी ते ११ जानेवारी या कालावधीत करण्यात आले. त्यात चित्रकला, हस्तकला, ठसेकाम, खळीत खेळणे, वेशभूषा, चित्रफित पाहणे, पाण्यात डुंबणे, सहभोजन अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन केले होते.

दरवर्षीप्रमाणे मुलांनी 'श्रीशंकरमठम् माटुंगा'तर्फे होणाऱ्या श्लोक–पठण स्पर्धेत व 'गोल्डन विंग्ज' चित्रकला स्पर्धेत भाग घेऊन राज्यस्तरीय बक्षिसे पटकावली.

शिशुवर्गाची वार्षिक सहल १८ जानेवारी रोजी जोगेश्वरी येथील 'मीनाताई ठाकरे उद्याना'त नेण्यात आली. येथे मुलांना १२ बलुतेदार व वेगवेगळ्या राज्यांचे नृत्य प्रकार पुतळ्यांच्या स्वरूपात पाहायला मिळाले.

**बैरामजी जीजीभॉय प्राथमिक विभाग :**

इयत्ता १ली ते ४थीची एकूण पटसंख्या ३०१.

दि.१४ जून रोजी शाळेचा पहिला दिवस (प्रवेशोत्सव) मुलांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करून साजरा करण्यात आला. विभागाचे शिक्षक निरीक्षक श्री. संखे यांनी शाळेला भेट देऊन शाळेची माहिती घेतली.

जुलै महिन्यात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली आणि 'प्लास्टिक बंदी व त्यावरील उपाय' या विषयावर एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली. शाळेचे व्यवस्थापक श्री. कोंडेकर यांनी अग्निशमन यंत्राच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

२७ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्रीमती पद्मश्री फाटक या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्याचबरोबर मंडळाचे पदाधिकारी व संस्थेचे हितचिंतक श्री. दळवी, श्रीमती मांजरेकर व श्रीमती साठे उपस्थित होते.

२९ जुलै २०१८ रोजी 'क्रिएशन ग्रुप केबीके ट्रस्ट' आयोजित चित्रकला स्पर्धेसाठी प्राथमिक विभागातून ४५ विद्यार्थी स्पर्धक म्हणून गेले होते. त्यातील ५ विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाले.

३ ऑगस्ट २०१८ रोजी महात्मा गांधी विद्यामंदिर आयोजित आंतरशालेय स्पर्धेतील चित्रकला स्पर्धेसाठी इयत्ता चौथीच्या वर्गातर्फे अथर्व खांदोरे व मयंक पुरोहित, रनिंग वर्ड्स स्पर्धेसाठी शिवराज वर्तक व भविषा शितप, स्मरणशक्ती स्पर्धेसाठी इयत्ता दुसरीच्या वर्गातर्फे ईश्वरी हळदणकर व अनुष्का मोरे, व टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे स्पर्धेसाठी इ. ३ री तून अथर्व रावणेकर हे विद्यार्थी गेले होते. त्यातील अथर्व रावणेकर या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

दीप अमावस्येनिमित्त इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांकडून मातीचे दिवे बनवून घेऊन त्यांची आरास करून सण साजरा करण्यात आला. नागपंचमीनिमित्त इयत्ता पहिली व दुसरीच्या मुलांकडून मातीचे नाग बनवून घेऊन त्यांचे प्रदर्शन भरवले.

आपल्या राष्ट्रपुरुषांची जयंती, अथवा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. तसेच वर्षभरात येणारे आपले पारंपरिक सण यानिमित्त कथाकथन, स्तोत्रपठण, वीरगीत गायन, उजळणी पठण, रांगोळी काढणे, कंदील बनवणे अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचं बक्षिसं देऊन

कौतुक करण्यात आले.

शालेय स्पर्धांप्रमाणेच बहि:शालेय स्पर्धांमधेही विद्यार्थ्यांनी तितक्याच उत्साहात सहभाग घेतला व बक्षिसे मिळवली.

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी आणि शिक्षक यांनी यावेळी देशभक्तिपर गीते सादर केली.

२४ ऑगस्ट २०१८ रोजी प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या दंतचिकित्सा शिबिरासाठी डॉ. हेमलता राव व डॉ. रमीथा मॉयली, तसेच त्यांच्या मदतनीस अंकिता बाटे उपस्थित होत्या. सकाळी १० ते दुपारी २.३० या वेळेत विद्यार्थ्यांची दंत–तपासणी करण्यात आली.

२९ ऑगस्ट २०१८ रोजी वनराई पोलीस ठाणे येथून महिला पोलीस निरिक्षिका – वरलक्ष्मी शकीनाल, साहाय्यक पोलीस निरीक्षक – अशफाक शेख , महिला पोलीस शिपाई – शीतल माने आल्या होत्या. त्यांनी मुलांना चांगला, वाईट स्पर्श याविषयी मार्गदर्शन केले.

८ सप्टेंबर २०१८ रोजी Disney Stayfit With Mickey Minnie तर्फे सागर घुगे व सुमित सांगळे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यसंपन्न कसे राहावे याचे मार्गदर्शन केले.

२ ऑक्टोबर २०१८ रोजी गांधीजयंतीनिमित्त इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांची गोगटेवाडी – नाईकवाडी – आरेरस्ता मार्गे प्रभातफेरी काढण्यात आली. पालकही या प्रभातफेरीला उपस्थित होते.

२७ डिसेंबर २०१८ रोजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील सर्व विद्यार्थ्यांना सकाळी १० ते २ या वेळेत शासनातर्फे गोवर व रुबेला लस देण्यात आली.

२८ व २९ डिसेंबर रोजी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा 'वार्षिक क्रीडामहोत्सव' शाळेच्या वेळेत शाळेच्या पटांगणातच घेण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ या वर्षातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासेतर कलागुणांचे कौतुक व गुणगौरव करण्यासाठी वार्षिक बक्षीस समारंभाचे आयोजन ३ एप्रिल रोजी करण्यात आले. या समारंभाला दहिसर येथील 'सुभेदार रामजी आंबेडकर विद्यालया'चे मुख्याध्यापक श्री. दीपक गावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**सन्मित्र मंडळ विद्यामंदिर (माध्यमिक विभाग):**

२०१८–१९ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि. १५ जून रोजी झाली.

मुख्याध्यापक श्री. गव्हाळे सर व पर्यवेक्षिका सौ. मोरे बाई यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शाळेचा दहावीचा एकूण निकाल या वर्षी ९१.०७ टक्के लागला. कु. जान्हवी अजित वर्तक ही विद्यार्थिनी ९५.६० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम आली.

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त ९वी 'ब'च्या विद्यार्थ्यांनी प्राणायाम व ओमकार उच्चाराचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याचप्रमाणे २६ जून रोजी गावडे सरांनी मुलांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार व योगासने करून योगदिन साजरा केला.

१४ जुलै रोजी 'महर्षी कणाद विज्ञान मंडळा'चे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून कुलदीप विद्यालयाचे श्री. माळी सर उपस्थित होते.

२१ जुलै रोजी शालान्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा साजरा

करण्यात आला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून गोरेगाव विभागाचे माननीय संघचालक श्री. विष्णूजी वझे उपस्थित होते.

२७ जुलै रोजी शालेय सभागृहात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. सकाळच्या सत्रात 'बैरामजी जीजीभाय' प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. अजिता लाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले; तर दुपारच्या सत्रात नागरी निवारा शाळेचे शिक्षक श्री. प्रशांत माईणकर सरांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

६ ऑगस्ट रोजी संगणक कक्ष वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला तीनही विभागांचे सर्व शिक्षक, मंडळाचे पदाधिकारी व प्रमुख अतिथी श्री. पालकर उपस्थित होते.

१५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण करून स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. संस्थेच्या प्रथेप्रमाणे माध्यमिक विभागातून निवृत्त होणारे शिपाई श्री. नाना नानरकरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांनी देशभक्तिपर गीते गाऊन स्वातंत्र्योत्सव साजरा केला. कार्यक्रमाला मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

२७ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

५ सप्टेंबर शिक्षकदिनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री.गव्हाळे सरांनी 'डॉ. राधाकृष्णन्' यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांना डॉ. राधाकृष्णन् यांच्या कार्याची माहिती सांगितली. इयत्ता दहावी व सातवीच्या काही विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अध्यापनाचे काम केले.

७ सप्टेंबर रोजी इयत्ता पाचवी ते इयत्ता सातवीच्या मुलांसाठी चित्रकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र राज्याच्या गोवर–रुबेला उच्चाटन मोहिमेअंतर्गत पालकांचे प्रबोधन करण्यासाठी २२ सप्टेंबर रोजी वर्गनिहाय पालकसभा घेण्यात आल्या. तसेच २५ ते २९ सप्टेंबर दरम्यान विद्यार्थ्यांसाठी गोवर–रुबेला विषयासंबंधी भित्तीपत्र, निबंध, वक्तृत्व, घोषवाक्य व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.

२९ सप्टेंबर रोजी श्री. गोरे सरांनी 'तंबाखूमुक्त शाळा' या विषयावर विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले.

१५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तकांचा आस्वाद घेतला.

२६ नोव्हेंबरला 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. श्री. गावडे सरांनी भारतीय संविधानाबद्दल माहिती सांगितली.

३० नोव्हेंबर रोजी शाळेतील सर्व शिक्षकांनी वांद्रे येथील शिक्षणवारीला भेट दिली.

२७ डिसेंबर रोजी गोवर–रुबेला उच्चाटन मोहिमेअंतर्गत इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलांना शासनातर्फे लस टोचण्यात आली.

३ जानेवारी रोजी पहिल्या स्त्री शिक्षिका 'सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी करण्यात आली. सकाळच्या सत्रात सौ. गावडे बाईंनी, तर दुपारच्या सत्रात सौ. धस बाईंनी सावित्रीबाईंच्या जीवनाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. याच अनुषंगाने ४ जानेवारी रोजी 'लेक वाचवा – लेक शिकवा' अभियानांतर्गत दोन किंवा अधिक मुली असलेल्या स्त्री पालकांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नंदादीप शाळेचे श्री. जगदाने सर व शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. जोशी बाई उपस्थित होत्या.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. जोशी सर यांच्या

हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

१५ फेब्रुवारी रोजी शालेय वार्षिक समारंभ साजरा करण्यात आला. दुपारच्या सत्रात प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थी सौ. विशाखा कुलकर्णी उपस्थीत होत्या.

२७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा दिन' आणि २८ फेब्रुवारी रोजी 'विज्ञान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे शाळेत महाकवी कालिदास दिन, हिंदी भाषा दिन, तसेच राष्ट्रपुरुषांची जयंती, पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा यानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या; त्याचप्रमाणे दिनमाहात्म्य मुलांना सांगण्यात आले. 'वझे वक्तृत्व स्पर्धा', गीता पाठांतर स्पर्धा, प्रश्नमंजुषा, काव्यवाचन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या स्पर्धा वर्षभरात घेण्यात आल्या व विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नेहरू विज्ञान केंद्रातर्फे घेतल्या जाणाऱ्या 'आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा' स्पर्धेत सान्मित्रच्या विद्यार्थ्यांनी भाग घेऊन मराठी माध्यमाच्या शाळांमधून द्वितीय क्रमांक पटकावला. कु. अस्मिता अरविंद सुतार, कु. अथर्व ललित चुरी (इयत्ता दहावी ब); कु. यशस्वी यशवंत खैरे (इयत्ता नववी ब) व कु. अनुजा प्रशांत सोमण (इयत्ता आठवी ब) या विद्यार्थ्यांनी शाळेचे प्रतिनिधित्व केले. या आधी सलग तीन वर्षे शाळेला या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

'विद्यार्थी विज्ञान मंथन' ही विज्ञानभारती, विज्ञान प्रसार (विज्ञान आणि प्रऔद्योगिक विभाग, भारत सरकार) व एन.सि.इ.आर.टी (मनुष्य बळ विकास मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय स्तरावर घेतली जाणारी परीक्षा असून पूर्णपणे डिजिटल साधने (स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅब इ.) वापरून विद्यार्थी ही परीक्षा देतात.

मूलभूत विज्ञानाची रुची विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हे या परीक्षेचे उद्दिष्ट आहे. या वर्षी संपूर्ण देशातील ६,२३० शाळांतील १,४४,८३९ विद्यार्थ्यांनी या परीक्षेची प्राथमिक फेरीची परीक्षा दिली.

सन्मित्रच्या इयत्ता सहावी ते नववीतील एकूण १५ विद्यार्थ्यांनी स्मार्टफोन वापरून ही परीक्षा दिली. इयत्ता सातवीतील कु. रुद्र राजन जोशी याने मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांमधून तृतीय क्रमांक पटकावला.

तसेच कु. लावण्या अजय तळवडेकर ही विद्यार्थिनी मुंबई उपनगर जिल्ह्यातील नववीच्या सगळ्या विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. मोरेबाई व सौ. कदम बाई यांनी मार्गदर्शन केले.

**मंडळाचे उपक्रमः**

❖ २००७ पासून सुरू करण्यात आलेला इंग्रजी संभाषण वर्ग इयत्ता तिसरी ते आठवीसाठी राबवला जातो. मराठी माध्यमाची मुले इंग्रजी विषयात मागे राहू नयेत, यासाठी हा उपक्रम राबवला जातो. या वर्षी एकूण १६ शिक्षिका या उपक्रमांतर्गत इंग्रजी शिकवत होत्या. इयत्ता सातवीची मुले या उपक्रमांतर्गत ब्रिटिश कौन्सिल संस्थेची परीक्षा देतात. विद्यार्थ्यांना ब्रिटिश कौन्सिलतर्फे सर्टिफिकेट दिले जाते.

❖ 'सेव्ह द चिल्ड्रन' या संस्थेतर्फे एक उपक्रम आपल्या शाळेत राबवला जातो. त्यांच्या शिक्षिका शाळेत येऊन दुसरी ते पाचवीच्या अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांना वेगळे बसवून शिकवतात. त्यामुळे अशा मुलांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. प्रत्येकी दीड तासाच्या चार तासिका रोज घेतल्या जातात.

❖ 'सन्मित्र मंडळ माजी विद्यार्थी संघा'तर्फे मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'गमतीचा तास' हा उपक्रम दर शनिवारी राबवला गेला. ह्या उपक्रमामागे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि त्यांची एकाग्रता वाढविणे, अभ्यास आणि शाळेविषयीची आवड वाढविणे असे विविध उद्देश आहेत.

❖ 'प्रथम फाउन्डेशन'तर्फे इयत्ता तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येते. या उपक्रमाचे यंदा तिसरे वर्ष होते.

❖ शाळेच्या ज्येष्ठ साहाय्यक शिक्षिका सौ. संखे बाई व शिपाई श्री. बबन काका ३१ मे २०१८ रोजी सेवानिवृत्त झाले. १ मे नंतर शाळा बंद होऊन शिक्षक सुटीवर जात असल्याकारणाने त्यांचा सेवागौरव समारंभ एप्रिल महिनाअखेरीस आयोजित केला होता. दि. ३० नोव्हेंबर २०१८ला माध्यमिकचे शाळेचे शिपाई श्री. नाना नानरकर सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवागौरव समारंभ करण्यात आला.

❖ शाळेच्या हीरक महोत्सवानिमित्त माजी विद्यार्थिनी कु. तन्वी प्रवीण माईणकर हिने स्वयंचलित सॅनिटरी पॅड देणारे व ते पॅड जाळणारे (INCINERATOR) मशीन शाळेला भेट म्हणून दिले. या दोन्ही मशीन्सची एकूण किंमत रु. ४८,७५० आहे. नोकरीनिमित्त सध्या अमेरिकेत वास्तव्याला असणारी तन्वी वेळात वेळ काढून या कार्यक्रमासाठी शाळेत उपस्थित राहिली.

❖ हीरक महोत्सवानिमित्त दिवाळीच्या सुटीत शाळेला बाहेरून रंग देण्यात आला, तसेच शाळेच्या कुंपणाची भिंतही रंगवण्यात आली. या सर्व कामासाठी साडेतीन लाख रु. खर्च आला.

❖ 'युथ फॉर डेमोक्रसी' या संघटनेतर्फे शाळेच्या मैदानाचे सुशोभीकरण विनामोबदला करून देण्यात आले.

**(प्रकाश ग. नानिवडेकर)**
संयुक्त कार्यवाह

**(प्रशांत सु. आठले)**
संयुक्त कार्यवाह

*(१२ सप्टेंबर २०१९)*

●●●

**R. R. Shet & Co.**
CHARTERED ACCOUNTANTS

**Rajesh R. Shet** F.C.A.
4, Ramnivas, Tilak Nagar, Aarey Road, Goregaon (East), Mumbai - 400 063.
Tel.: 2927 15 08 - Mobile : 98209 73498 - Email : rrshetco@gmail.com

# AUDITOR'S REPORT

To,
The Members of,
**Sanmitra Mandal, Goregaon.**

We have audited the attached Balance sheet of **Sanmitra Mandal, Goregaon** as at 31st March,2019 and its Income & Expenditure account for the year ended on that date with the Books of Accounts,vouchers and other documents as were available with the Trust and as were produced to us inconnection with Audit. Further we report that:

1. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and beliefwere necessary for the purpose of our audit.

2. In our opinion, the proper books of accounts as required under the Bombay Public Trust Act, 1950 and rules made under that Act and the bye-laws of the Trust have been kept by the Trust so far as it appears from our examination of those books.

3. The balance sheet and the Income & expenditure account examined by us are in agreement with the books of accounts of the Trust.

4. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts read together with the observations thereon give a true and fair view.

   a. in the case of Balance sheet, of the state of affairs of the Trust for the year ended 31st March,2019 and

   b. in the case of Income & Expenditure account of the surplus for the year ended on that date.

For **R. R. Shet & Co.,**
**Chartered Accountants**

Rajesh R. Shet

Rajesh R. Shet
Proprietor

R. R. SHET & CO. ★ MEMBERSHIP No. 101519 ★ CHARTERED ACCOUNTANTS

Place : Mumbai
Date : 09/09/19
**UDIN : 19101519AAAAAZ3589**

**Report of an auditor relating to account audited under sub-section (2) of section 33 & 34 and Rule 19 of the Bombay Public Trusts Act.**

Name of the Public Trust : **SANMITRA MANDAL, Goregaon**

Registration No. : **E-1817(MUMBAI)**

For the year ending : **31st March, 2019**

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules; | Yes |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts; | Yes |
| (c) | Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts; | Yes |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him; | Yes |
| (e) | Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; | Yes |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information | Yes |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust; | No |
| (h) | The amounts of outstanding for more than one year and amount written off, if any; | Nil |
| (i) | Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs 5000/- | Yes |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35 ; | No |
| (k) | Alienation if any of the immovable property contrary to the provision of Section 36 which have come to the notice of the auditor; | No |
| (l) | All cases of irregular, illegal or improper expenditure or failure, or omissions to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property there of and whether such expenditure, failure, omission, loss or waste was caused in consequence of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustless or the trustees any person while in the management of the trust ; | No such cases were noticed. |
| (m) | Whether the budget has been filed in the form provided rule 16A; | Yes |
| (n) | Whether the maximum & minimum number of the trustees is maintained; | Yes |
| (o) | Whether the meeting are held regularly as provided in such instrument; | Yes |
| (p) | Whether the minute book of the proceeding of the meeting is maintained; | Yes |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust; | No |
| (r) | Whether any of the trustees is debtor of creditor trust; | No |
| (s) | Whether the irregularities pointed out by the auditors in the account of the pervious year have been duly complied with by the trustees during the period of audit ; | Yes |
| (t) | Any special matter which the auditor may think fit or bring to the notice of the Deputy Charity Commissioner. | No |

**For R. R. Shet & Co.,**

**Chartered Accountants**

Rajesh R. Shet

R. R. SHET & CO. ★ MEMBERSHIP No. 101519 ★ CHARTERED ACCOUNTANTS

**Rajesh Shet**

**Proprietor**

Place : Mumbai

Date : 09/09/19






सांगता समारोहा नंतर आपल्या **फेसबुक** पेज वर **श्री विनोदजी तावडे** यांनी लिहिलेल्या ओळी.

4G 4:20 ... 71%

← Vinod Tawde

**Vinod Tawde** added 5 new photos. ...
Jun 23 at 3:17 PM •

गेली ६० वर्षे उत्तम विद्यार्थी घडविण्याचे उल्लेखनीय कार्य गोरेगाव येथील सन्मित्र मंडळ शैक्षणिक संस्था करीत आहे. आज या संस्थेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात सहभागी होतांना समाधान वाटले. संस्थाचालक, शिक्षक आणि माजी विदयार्थी यांचे प्रयत्न, गुणवत्तेच्या आधारावर मराठी माध्यमाचा केलेला विकास, मातृभाषेतून शिक्षणाचा केलेला पुरस्कार या गुणांनी या शाळेने महाराष्ट्रात आदर्श निर्माण केला आहे. येत्या काळात कौशल्य विकासाचा कार्यक्रम यशस्वी करण्याचा संकल्प व निर्धार शाळेने करावा असे आवाहन करीत या संस्थेला शुभेच्छा दिल्या. नवभारताची नवी पिढी घडविणाऱ्या महाराष्ट्राच्या अशा शाळांचा आम्हाला अभिमान आहे आणि महाराष्ट्र शासन सदैव त्यांच्या पाठीशी असेल.

संस्थेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या सांगता समारोहाला प्रमुख पाहुणे म्हणून, **महाराष्ट्र राज्याचे मा. शिक्षण मंत्री श्री. विनोदजी तावडे** उपस्थित होते. त्यांना हीरक महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेचे स्मृतीचिन्ह भेट देताना संस्थेचे **अध्यक्ष श्री. विजय वि. जोशी** समोर **संयुक्त कार्यवाह श्री. प्रशांत सु. आठले.**

# सन्मित्र मंडळ, गोरेगांव

गोगटेवाडी, आरे रोड, गोरेगाव (पू), मुंबई - ६३. दू.: २९२७७०११











# सन्मित्र मंडळ, गोरेगांव

गोगटेवाडी, आरे रोड, गोरेगाव (पू), मुंबई - ६३. दू.: २९२७७०११






